**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ. प्रियांका नारायण खरे
घर नं.४०४, गवळीवाडा, जुना बाजार,
खडकी, पुणे-४११ ००३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे जिल्हा (ग्रामीण) — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
खेड विभाग, राजगुरुनगर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ. प्रियांका नारायण खरे, घर नं.४०४, गवळीवाडा, जुना बाजार, खडकी, पुणे-४११ ००३

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी खेड विभाग, राजगुरुनगर, जि. पुणे श्री. आर. आर. बनसोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

श्री. उमेश यादव, पोलीस उपनिरीक्षक यांनी तपास केलेल्या सन २००४ जे २००६ च्या सर्व ३०२ च्या केसेसची माहिती, रिपोर्ट, पंचनामा, पोस्टमार्टेम रिपोर्ट, पंचनामा, केमिकल ॲनालाईझरचा रिपोर्ट व स्टेशन डायरीमधील नोंदी व फायनल रिपोर्ट यांच्या प्रमाणित छायांकित प्रती

## विवेचन

पोलीस उपनिरीक्षक, खेड पोलीस स्टेशन श्री. उमेश यादव यांनी तपास केलेल्या गुन्ह्यांच्या संदर्भातील सन २००४ ते २००६ या काळातील माहिती अपीलकर्त्या डॉ. प्रियांका नारायण खरे यांनी मागितली होती. ती न मिळाल्याच्या कारणावरून डॉ. खरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड विभाग यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने डॉ. खरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. उमेश यादव यांनी सन २००४ ते २००६ या काळातील तपास केलेल्या सर्व प्रकरणांचे पंचनामे, रासायनिक पृथक्करण अहवाल इत्यादी माहिती डॉ. खरे यांनी मागितली आहे. त्यांचा मयत मुलगा सिध्दार्थ नारायण खरे याच्या उत्तरीय तपासणीचा व रासायनिक पृथक्करणाचा अहवाल मिळणेबाबत यापूर्वीही त्यांनी अर्ज केले होते, त्याची माहिती त्यांना त्या त्या वेळी देण्यात आली आहे. भारतीय दंड विधान कलम ३०२ सारख्या कलमांतर्गत केलेल्या तपासाच्या सर्व प्रकरणांची माहिती त्यांनी मागितल्यामुळे विधिसल्लागार, पोलीस अधीक्षक (ग्रामीण) कार्यालय यांचा सल्ला घेण्यात आला. 'ज्या प्रकरणात दोषारोपपत्र न्यायालयात पाठविले आहेत व ज्या प्रकरणात चौकशी प्रकरण उपविभागीय दंडाधिकारी यांचेकडे पाठविले आहेत अशा सर्व प्रकरणांचे खटला क्रमांकाची माहिती अर्जदारास देऊन त्यांनी सदर न्यायालय व उप. वि. दंडाधिकारी यांचेकडून नकला

घेण्याबाबत कळविण्यात यावे इत्यादी मार्गदर्शन करण्यात आले,' असे तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड विभाग श्री. पी. आर. पाटील यांनी दि. २८.४.२००६ च्या पत्रात नमूद केले आहे. श्री. पाटील, तसेच विद्यमान उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. आर. आर. बनसोडे यांनी 'अर्जदार त्यांच्याशी संबंधित नसलेल्या कागदपत्रांची मागणी' करीत असल्याचे म्हटले आहे. विधिसल्लागाराच्या सल्ल्यानुसार उत्तर तयार करून डॉ. खरे यांना पाठविण्यात आले. परंतु डॉ. खरे यांनी ते स्वीकारले नाही, असे श्री. बनसोडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. आपल्याला सिध्दार्थ खरे यांच्या संदर्भातील उत्तरीय तपासणी व रासायनिक पृथक्करण अहवाल मिळाला असून दि. १३.४.२००६ रोजी केलेले अपील / अर्ज मागे घेत आहे, असे पत्र डॉ. खरे यांनी पोलीस अधीक्षक, पुणे (ग्रामीण) यांना सादर केल्याचे सांगून श्री. बनसोडे यांनी त्या पत्राची प्रत सादर केली. मात्र आपण दिलेले हे पत्र वेगळ्या अपिलाच्या संदर्भात असून संदर्भित अपिलाबाबतची माहिती आपल्याला मिळालेली नाही, असे निवेदन डॉ. खरे यांनी दि. १७.१०.२००७ रोजी आयोगाला सादर केले. परंतु मूळ अर्जातील मागणीपेक्षा अतिरिक्त तपशील त्यात नमूद केला आहे. (उदा. डॉ. नारायण खरे व उप निरीक्षक श्री. यादव यांनी एकत्रितरीत्या केलेल्या उत्तरीय तपासणीची प्रकरणे.)

डॉ. खरे यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने आयोगाने विचारणा केली असता उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड विभाग यांना सादर केलेल्या अहवालाशी आपण सहमत असल्याचे निवेदन पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचेकरिता स्वाक्षरी करणारे श्री. के.जी.देशपांडे यांनी सादर केले आहे. आपल्याशी संबंधित नसलेल्या विषयाची माहिती डॉ. खरे यांनी मागितल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. पी.आर. पाटील, श्री. आर.आर. बनसोडे व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्याकरिता स्वाक्षरी करणारे श्री. के.जी.देशपांडे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच देऊ केलेली माहिती श्रीमती खरे यांनी घेतली नसल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. अर्जदाराने स्वतःशी संबंधित अशी माहिती मागण्याचे बंधन कायद्यात नाही, त्यामुळे त्यांचे हे विधान माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शी सुसंगत नाही. मात्र त्यांनी देऊ केलेली माहिती न स्वीकारण्याचे अपीलकर्त्याचे कृत्यही योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. अपीलकर्त्या डॉ. खरे यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याबाबत योग्य ती कार्यवाही केली आहे. विधिसल्लागार यांच्या सल्ल्यानुसार तपासणी पूर्ण झालेल्या प्रकरणांची कागदपत्रे डॉ. खरे यांना हवी असल्यास त्यांच्या मूळ अर्जातील मागणीशी संबंधित कागदपत्रे त्यांना नि:शुल्क द्यावीत. त्याबाबतचा पूर्तता अहवाल दि. ५.४.२००८ पर्यंत जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७.३.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.रविंद्र महादेव देसाई
३/२२, लक्ष्मीनगर, पर्वती, पुणे-९ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
ढोले पाटील रोड, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१५ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविंद्र महादेव देसाई
३/२२, लक्ष्मीनगर, पर्वती, पुणे-९

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
ढोले पाटील रोड, पुणे श्री.अनिल हिम्मतराव शिंगणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.-- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

शिशुवर्गात प्रवेश देण्यासाठी देण्यात आलेल्या देगणीसंबंधी गैरप्रकार झालेबाबत.

## विवेचन

शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे-३० या संस्थेच्या शाळेमध्ये आपल्या मुलीला शिशुवर्ग, मोठा गट या वर्गात प्रवेश देण्यासाठी दिलेल्या रु.५,०००/- देणगीबाबत झालेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीच्या मागणीबाबत काय कार्यवाही झाली, अशी माहिती अपीलकर्ता श्री.रविंद्र महादेव देसाई यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे मागितली होती. दि.२८.३.२००३ रोजी आपण हा अर्ज दिला होता. परंतु अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही, अशी श्री.देसाई यांनी तक्रार केली आहे. अध्यक्ष / चिटणीस शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे-३० यांनी या संदर्भात पाठविलेल्या पत्राची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.देसाई यांना पाठविली, परंतु आपण मागितलेली कार्यवाहीची माहिती ही नाही, असे नमूद करुन श्री.देसाई यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अपील केले. परंतु त्यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व माहिती न मिळाल्यामुळे श्री.देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे हा विषय प्रलंबित असून चौकशीच्या अनुषंगाने त्यांच्याकडेच निर्णय होईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. ए.एच. शिंगणे यांनी सांगितले.

## आदेश

कार्यवाहीचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नसल्यामुळे व सहाय्यक धर्मादाय आयुक्तांपुढे संबंधित विषयाचा निर्णय होणे उचित असल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ, पुणे

पुणे
दि.१०.३.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र प्रल्हाद पवार
बालाजी निवास, आदर्श नगर,
ता. बार्शी, जि. सोलापूर                                   अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
उपविभागीय कृषि अधिकारी, कुर्डुवाडी
ता. माढा, जि. सोलापूर                                   उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
तालुका कृषि अधिकारी, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | प्रथम अपिलाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ५६४ /सोलापूर | २२.५.२००७ | २०.६.२००७ | २.७.२००७ | १.८.२००७ |
| ५९८ /सोलापूर | ३०.१०.२००७ | २४.११.२००६ | ९.१.२००७ | २५.६.२००७ |
| ५९७ /सोलापूर | २६.३.२००७ | २४.४.२००७ | ३.५.२००७ | -- |

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

**१.** केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत ऊस विकास, मका विकास, कडधान्य विकास यासाठी शासनाकडून सन २००५ ते २००६ व २००६ ते २००७ या कालावधीतील अनुदान रकमेबाबत माहिती

**२.** जानेवारी २००४ ते ऑगस्ट २००५ या कालावधीत रोजगार हमी योजनेमार्फत कामाचे हजेरीपत्रक व देयकाबाबत माहिती

**३.** दि. १.३.२००५ ते माहे जून २००५ अखेर तालुक्यातील पाच मंडळानी केलेल्या रो.ह.यो. च्या कामाचे हजेरी पत्रकाच्या साक्षांकित प्रती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रामचंद्र प्रल्हाद पवार यांनी केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत ऊस विकास, मका विकास, कडधान्य विकास यासाठी शासनाकडून सन २००५ ते २००६ व २००६ ते २००७ या कालावधीत मिळालेली अनुदान रक्कम, जानेवारी २००४ ते ऑगस्ट २००५ या कालावधीत रोजगार हमी योजनेमार्फत कामाचे हजेरीपत्रक व देयक याबाबत माहिती मागितली होती. तसेच दि. १.३.२००५ ते माहे जून २००५ अखेर तालुक्यातील पाच मंडळानी केलेल्या रो.ह.यो. च्या कामाचे हजेरी पत्रकाच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली होती. याबाबत जन माहिती अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे कारणावरुन श्री. पवार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कुर्डुवाडी यांच्याकडे अपील केले. त्यांनी दिलेल्या आदेशानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून श्री. पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत.

या तीन अपिलांबाबतची माहिती आपणास तालुका कृषि अधिकारी, बार्शी यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेली असल्याने काहीही तक्रार राहिलेली नसल्याने ही तीनही अपिले निकाली काढण्याबाबत श्री. पवार यांनी दि. २७.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास विनंती केली आहे. ही बाब विचारात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.३.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.
दि. २९.३.२००८.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:कोल्हापूर / ८१** |
| १. | **अपीलकर्ता** | : श्री.दिलीप अशोक देसाई<br>ए-२२, 'सरगम विहार',<br>अपार्टमेंट, जि.प.ऑफिसमोर, नागाळा पार्क,<br>कोल्हापूर-४१६००३ |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :शहर अभियंता,<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित. हजर राहात नसल्याबाबत अपीलकर्ता व जन माहिती अधिकाऱ्यांनी काहीही कळविलेले नाही. अपीलकर्त्यांनी विस्तृत माहिती मागणी केल्याने काही माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.
(२) उर्वरीत माहिती अपीलकर्त्याला द्यावी व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आठ दिवसात पूर्तता अहवाल सादर करावा.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.
दि. २९.३.२००८.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:कोल्हापूर / ८२** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.दिलीप अशोक देसाई<br>ए-२२, 'सरगम विहार',<br>अपार्टमेंट, जि.प.ऑफिसमोर, नागाळा पार्क,<br>कोल्हापूर-४१६००३ |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :सहाय्यक आयुक्त क्र.२,<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित. हजर राहात नसल्याबाबत अपीलकर्ता व जन माहिती अधिकाऱ्यांनी काहीही कळविलेले नाही. प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने कळविले असले तरी प्रतिनिधी पाठविणे आवश्यक होते. प्रथम अपीलाच्या निकालानुसार माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शशिकांत पेमराज चंगेडे,
३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर-४१४ ००१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परीक्षक,
सहकारी संस्था वर्ग-१, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५२ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शशिकांत पेमराज चंगेडे, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर-४१४ ००१

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक,सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. प्रकाश अष्टेकर

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष लेखा परीक्षक सहकारी संस्था वर्ग-१,
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री. व्ही. आर. काटकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. नगर अर्बन बँक, अहमदनगर यांच्याबाबत लेखापरीक्षण अहवालात घेतलेल्या गंभीर आक्षेपा बाबत दिलेल्या उत्तरानुसार काय कारवाई प्रस्तावित केली.
२. सन १९८८ ते २००४ या वर्षातील आक्षेप नोंदविण्यास उशीर होण्याबाबतची माहिती
३. बँकेस भेट देणाऱ्या प्रतिष्ठित खातेदारांकरिता केलेला तबांखू, सिगारेट व गुटखा यावरील खर्च पोलिस अधिनियम १९५७ कलम ११६ व ११७ नुसार सूट आहे का याची माहिती

## विवेचन

नगर अर्बन बँक , अहमदनगर या बँकेबाबतच्या दोषदुरुस्ती अहवालाविषयाची माहिती अपीलकर्ता श्री.शशिकांत पेमराज चंगेडे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक (नागरी बँका),सहकार आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे मागितली होती. तत्कालीन उपनिबंधक श्री.संजीव खडके यांनी ती नाकारल्यामुळे श्री.चंगेडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांच्याकडे अपील केले. त्याची दखल घेतली नाही, म्हणून श्री.चंगेडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सन १९९८ ते २००४ या काळातील माहिती श्री.चंगेडे यांनी मागितली असून मुख्यतः कार्यवाहीची मागणी त्यात समाविष्ट आहे. नागरी बँकाना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याचे परिपत्रक सहकार आयुक्त यांनी जारी केले असून, त्याचा आधार घेऊन माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात येत असल्याचे प्रतिपादन श्री.चंगेडे यांनी केले. शासकीय आदेश किंवा परिपत्रक कायद्यापेक्षा श्रेष्ठ नाही; असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट म्हटले आहे, याचा उल्लेख श्री.चंगेडे यांनी विशेषत्वाने केला.

नगर अर्बन बँकेच्या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांच्या अनुषंगाने कार्यवाही हा श्री.चंगेडे यांचा मुख्य विषय आहे. त्यानुसार कार्यवाही होत असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे श्री.एस.जी.जठार यांनी लेखी

निवेदनात नमूद करुन त्या संदर्भातील तपशीलवार माहिती दिली आहे. कार्यवाही होत असल्याचे श्री.चंगेडे यांनी मान्य केले, मात्र अर्जाची वेळीच दखल घेतली जात नाही, अपिलाची सुनावणी वेळेत होत नाही व लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांची गंभीर दखल घेऊन त्वरित कार्यवाही केली जात नाही, या बाबींकडे आपण लक्ष वेधू इच्छितो, असे श्री.चंगेडे यांनी आवर्जून नमूद केले. त्यांच्या या निवेदनाची दखल संबंधित अधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये अपेक्षित असलेली पारदर्शकता व उत्तरदायित्व यांचाच आग्रह अपीलकर्ता धरत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ, पुणे

पुणे
दि.१७.३.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे, खंडपीठ ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे, खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

साथी बशीर अहमद बाशामियाँ शेख,
४१२, तुळजाभवानी नगर, अक्कलकोट रोड,
सुतमिल मागे, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, सोलापूर
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
प्रभारी तहसीलदार, संगानियो (शहर),
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** साथी बशीर अहमद बाशामियाँ शेख,
तुळजाभवानी नगर, अक्कलकोट रोड, सुतमिल मागे, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर जिल्हाधिकारी, सोलापूर
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. मा. गो. मांडुरके

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना (शहर),
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्रीमती एस.व्ही. गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.३.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

अ) सौ. खुर्शीदबी इकबाल शेख, रा. १३, शास्त्रीनगर, सोलापूर यांचे पतीचे मृत्यू झाल्या कारणाने नियमानुसार कुटूंब लाभ योजनेचा फायदा र.रु.१०,०००/- मिळणेबाबत केलेले अर्जानुसार तहसीलदार संजय गांधी निराधार योजना (शहर), सोलापूर यांनी दि. २६.८.२००५ रोजी लेखी पत्र पाठवून त्रुटीची पूर्तता करणेबाबत कळविले होते त्यानुसार त्यांनी पूर्तता केलेली आहे. अद्याप पर्यंत त्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही.

ब) सोलापूर शहर लोकजनशक्ती पार्टीचे वतीने जिल्हाधिकारी सोलापूर यांना दि. ८.१२.२००५ रोजी दिलेल्या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीची माहिती.

क) केंद्र / राज्य सरकारकडून कुटूंब प्रमुखाचा मृत्यू झालेनंतर वारसदारास रु. १०,०००/- कुटूंब लाभ योजनेअंतर्गत संजय गांधी निराधार योजना, सोलापूर शहरच्या बैठकीत २ जानेवारी २००५ पासून डिसेंबर अखेर असे एकूण किती प्रकरणे मंजूर करण्यात आली त्या लाभार्थींची नावे, पत्ते व बँकेमार्फत आर्थिक अनुदान दिले त्या बँकेचे नावासहीत यादी

## विवेचन

सौ. खुर्शीदबी इक्बाल शेख यांच्या पतीच्या मृत्यूनंतर त्यांना कुटुंब लाभ योजनेचा फायदा मिळण्याच्या संदर्भातील, तसेच संजय गांधी निराधार योजनेत कुटुंब लाभ योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणांबाबतची माहिती अपीलकर्ता साथी बशीर अहमद बाशामियाँ शेख यांनी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना (शहर), सोलापूर यांच्याकडे मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांकडून ही माहिती न मिळाल्यामुळे श्री. शेख यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. 'जन माहिती अधिकाऱ्यांनी विलंबाने उत्तर दिलेले दिसून येते तसेच दिलेले उत्तर परिपूर्ण नाही असे दिसते. तेव्हा शासकीय माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० नुसार शास्तीस पात्र असलेचे दिसून येते. परंतु हे अधिकार राज्य माहिती आयोगास आहेत. शासकीय माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी योजना (शहर), सोलापूर यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती व उत्तर वेळेत दिले नाही व दिलेले उत्तर परिपूर्ण नसल्या कारणाने त्यांचेवर जिल्हाधिकारी सोलापूर (आस्थापना) स्तरावरुन उचित कार्यवाही होणे योग्य राहील,' असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी श्री. मधुकर आर्दड यांनी निकालपत्रात नमूद केले व

जन माहिती अधिकाऱ्यांनी आठ दिवसात माहिती पुरवावी, असा आदेश दिला. परंतु त्यानंतरही माहिती मिळाली नाही, त्याबाबत श्री. शेख यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांना स्मरणपत्र दिल्यानंतरही त्यांना माहिती मिळाली नाही. त्यामुळे श्री. शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अर्ज केल्यापासून (दि. ८.११.२००५) जवळजवळ दोन वर्षे होत आली तरी आपल्याला पूर्ण माहिती मिळालेली नाही, असे श्री. शेख यांनी नमूद केले. झालेल्या विलंबाबाबत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार श्रीमती एस.व्ही.गायकवाड, संजय गांधी योजना (शहर), सोलापूर आणि अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर श्री. मा.गो.मांडुरके यांनी कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण दिले नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी योजना (शहर), सोलापूर, श्री. आर.जी. माने (सध्या तहसीलदार, महाबळेश्वर, जि.सातारा) यांनी श्री. शेख यांच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही व विहित मुदतीत त्यांनी माहिती दिली नाही हे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयावरुनही स्पष्ट होते. तसेच श्री. आर.जी.माने यांना सूचना देऊनही विलंबाबाबतचे कोणतेही निवेदन त्यांनी आयोगाला सादर केलेले नाही. या स्थितीत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार श्री. आर.जी.माने हे शास्तीस पात्र ठरतात.

श्री. शेख हे जनरल कामगार युनियनचे (जि. सोलापूर) अध्यक्ष आहेत. संजय गांधी निराधार योजना (शहर), सोलापूर या कार्यालयाकडे माहितीच्या अधिकाराखाली ते वारंवार अर्ज करतात, वेळोवेळी त्यांना माहिती दिली आहे, परंतु त्यांच्या मनासारखे कोणतेही काम न झाल्यास ते कर्मचाऱ्यांविरुध्द तक्रारी करतात, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना (शहर), सोलापूर श्रीमती एस. व्ही. गायकवाड यांनी लेखी व तोंडी केले.

संबंधित संचिका श्री. शेख यांना सुनावणीच्या दिवसांपासून आठ दिवसात पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी, पाहणीनंतर त्यांना हव्या असलेल्या नकला व संबंधित माहिती द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. परंतु या मुदतीत अर्ज देऊनही आपल्याला माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार श्री. शेख यांनी दि. ७.१०.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे (प्राप्त

दि. ८.१०.२००७) आयोगाकडे केली आहे. मात्र दि. ५.१०.२००७ रोजी श्री. शेख यांना माहितीबाबतचे पत्र देऊ केले असता ते त्यांनी स्वीकारण्यास नकार दिला, त्यामुळे दि. ९.१०.२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने त्यांना हे पत्र पाठविले आहे, असे श्रीमती एस.व्ही. गायकवाड यांनी दि. ११.१०.२००७ च्या निवेदनाद्वारे (प्राप्त दि. १५.१०.२००७) आयोगाला कळविले आहे. मूळ अर्जातील मुद्दा क्र. अ ब ब बाबत परिपूर्ण कार्यवाही करण्यात आलेली आहे. मुद्दा क्रमांक क मधील एकूण १३४ लाभार्थ्यांच्या यादीची प्रत विनामूल्य सोबत जोडून पाठविली आहे, असे श्रीमती गायकवाड यांनी या पत्रात नमूद केले आहे. हे निवेदन लक्षात घेता श्री. शेख यांची तक्रार निराधार असल्याचे दिसते.

आयोगाने अपर जिल्हाधिकारी, सोलापूर श्री. मा. गो. मांडुरके, प्रभारी तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना (शहर) श्रीमती एस.व्ही.गायकवाड, तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय श्रीमती भोसले, व अव्वल कारकून श्रीमती तोरस्कर, संजय गांधी योजना शाखा, या अधिकारी / कर्मचाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधूनही संबंधितांच्या निवेदनाबाबत व स्पष्टीकरणाबाबत त्यांनी कळविले नाही. आयोग याची गंभीर दखल घेत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना (शहर), सोलापूर श्री. आर. जी. माने यांना रुपये २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती ही श्री. माने यांचेकडून मार्च २००८ च्या (देय एप्रिल २००८ ) वेतनातून पाच महिन्यांत समान हप्त्यात वसूल करावी. वसूल केलेली रक्कम '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१ )' या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी. त्याबाबतची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन त्याचा पूर्तता अहवाल जिल्हाधिकारी सातारा यांनी आयोगाला सादर करावा.

३.	अपर जिल्हाधिकारी, सोलापूर श्री. मा. गो. मांडुरके, प्रभारी तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना (शहर) श्रीमती एस.व्ही.गायकवाड, तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय श्रीमती भोसले, व अव्वल कारकून श्रीमती तोरस्कर, संजय गांधी योजना शाखा, या अधिकारी / कर्मचाऱ्यांना कडक समज देण्यात येत आहे. सार्वजनिक प्राधिकरण प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी याची नोंद घेऊन संबंधितांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात व तसे केल्याचे आयोगाला कळवावे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे, खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३.३.२००८**

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. जिल्हाधिकारी, सातारा
२. जिल्हाधिकारी, सोलापूर
३. उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई, जि. सातारा

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ.
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.
दि. २९.३.२००८.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

**अपील क्र** :**९२ / सांगली**

१. **अपीलकर्ता** :श्री. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील
'शितल', दामाणी हायस्कूलचे पुर्वेस,
चांदणी चौक, सांगली-४१६४१६

२. **जन माहिती अधिकारी** :कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
किल्ला भाग, मिरज, जि.सांगली

३. **अपिलीय प्राधिकारी** :अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
ताराबाई पार्क, कोल्हापूर

अपीलकर्ता गैरहजर. माहिती विलंबाने दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना पूर्वीच शास्ती करण्यात आलेली आहे. मात्र माहिती अपुरी मिळाल्याचे निवेदन अपीलकर्त्याने दिले आहे.

द्यावयाच्या राहिलेल्या माहितीची पूर्तता जन माहिती अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी यांनी उर्वरित माहिती १५ दिवसाचे आत अर्जदारास नि:शुल्क द्यावी व पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**